निवडणूक कार्यालय
पुणे महानगरपालिका.
जा.क्र.ःनि/ ६९
दिनांक ०७/०७/२०१०

मा. सल्लागार (कामगार)
पुणे महानगरपालिका.

यांजकडेस ...

विषय – मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ कलम ६० (अ) (३) अन्वये जाहीर करावयाची इकडील कार्यालयाकडील माहिती.

संदर्भ – १) कार्यालय परिपत्रक जा.क्र.अतिमआ(वि)/सका १९८,दि. दिनांक ३१/०५/२०१०.
२) सल्लागार कामगार कार्यालय जा.क्र. ३३२दि. ०५/०६/२०१० चे पत्र.

विषयांकित प्रकरणी या कार्यालयाकडील माहिती खालीलप्रमाणे ः

| अ.क्र. | कलम ६० (अ) (३) | माहिती |
|---|---|---|
| १ | महानगरपालिकेचा तपशील | परिचय<br>पुणे महानगरपालिकेच्या सार्वत्रिक व वेळावेळी होणा-या पोट निवडणूका संदर्भात राज्य निवडणूक आयोग,महाराष्ट्र,मुंबई यांचे आदेश-निर्देश नियंत्रणाखाली त्या अनुषंगाने सर्व प्रशासकीय यंत्रणा उभारून त्या मार्फत निवडणुका पार पाडणे कामी संपूर्ण कार्यवाही करणे, सार्वत्रिक/पोट निवडणुकांच्या निकालानंतर मे. लघुवाद न्यायालय तसेच मे. उच्च न्यायालयाची दाखल झालेल्या निवडणूक याचिकांची संपूर्ण कार्यवाही करणे. मतदार याद्यांतील नावांची नक्कल तयार करणे. पत्रव्यवहार पहाणे, निवडणूक विषयक अभिलेखाचे जतन करणे,नागरीकांना मतदार याद्या पाहणेसाठी उपलब्ध करून देणे, व निवडणूक संबंधी प्रशासकीय कार्यवाही करणे इत्यादी. |
| २ | महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली,कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे,परिषद,समित्या व इतर निकय दर्शविणारे विवरणपत्र मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या समित्यांच्या व इतर निकयांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकीची कार्यवृत जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत , | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| ३ | तिच्या आधिका-यांची व कर्मचा-यांची निर्देशिका ः | परिशिष्ठ ब मध्ये जोडली आहे. |
| ४ | महानगरपालिकेत्या कोणत्याही कामाकरीता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिका-यांचे तपशील, | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत,त्या तिमाहीचा लेखापरिक्षित ताळेबंद,जमा व खर्च,आणि पैशाचा ओघ (cash Flow) दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र,आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्याच्या आंत , संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरिक्षित वित्तीय विवरणपत्र, | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| ६ | महानगरपालिका पुरवत असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र. | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| ७ | सर्व योजनांचे तपशील,प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा अहवाल, | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| ८ | महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामासाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कायक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष, | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| ९ | महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनांचा,शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| १० | राज्य शासन, राजपत्रा तील अधि सूचने व्दारे विनिर्दिष्ट करेल असे, प्रमुख बांधकामांचे तपशील, तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील याबाबतची माहिती, | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |
| ११ | महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबीव्दारे मिळालेले उत्पन्न :-<br>अ) कर,शुल्क,उपकर आणि अधिभार मालमत्तेतून मिळणारे भाडे,लायसन व परवानगी यातून मिळणारी फी,<br>ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यातून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे<br>क)राज्य शासनाने वसूल केलेल्या करांच्या महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने,<br>ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपविलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने त्यांचे स्वरूप आणि | निवडणूक कार्यालयाशी संबंधीत नाही. |

| | | |
|---|---|---|
| | विनियोगाची मर्याद ा,<br>इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यामार्फत उभा केलेला पैसा, | |
| १२ | प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद, | सन २०१० – २०११ बजेट रूपये १०.०० लाख |
| १३ | विहित करण्यात येईल अशी इतर माहिती | माहिती अधिकार अधिनियमातील तरतूदीनुसार माहिती उपलब्ध करून देणे, दैनंदिन पत्रव्यवहार यादीतील नावांच्या नक्कल , नागरिकांना मागणीनुसार तयार करून देणे, राज्य निवडणूक आयोगाचे देखरेख , नियंत्रणाखाली निवडणूक विषयक विविध प्रकारचे काम पहाणे इत्यादी. |

उप आयुक्त (विशेष)
तथा निवडणूक अधिकारी
पुणे महानगरपालिका

# परिशिष्ठ ब

| अ.क्र. | हुद्दा | नाव | कार्यालयाचा पत्ता | दूरध्वनी |
|---|---|---|---|---|
| १ | सिनिअर ग्रेड लेखनिक | श्री हनुमंत गोविंद गायकवाड | निवडणूक कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ | २५५०११८० |
| २ | ज्युनिअर ग्रेड लेखनिक | श्री शेषराव दगू देशमुख | निवडणूक कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ | २५५०११८० |
| ३ | शिपाई | श्री शिवलिंगप्पा शिवप्पा उमागोळ | निवडणूक कार्यालय, शिवाजीनगर, पुणे ५ | २५५०११८० |

उप आयुक्त (विशेष)
तथा निवडणूक अधिकारी
पुणे महानगरपालिका